| MHKO030153622024 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.११२१/२०२४** |
|---|---|
| | बादशहा गैबी तराळ मयत तर्फे वारस वगैरे २ वि. असिस्टंट कलेक्टर, कोल्हापूर. |
| | नि.क्र.१ वरील आदेश |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८९ प्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, वि.प. यांनी अब्दुल रहेमान अबुबकर यांचेविरूध Custom Act 1962 Import and Export(Control) Act, 1947, Gold (Control) Act, 1968 मधील तरतुदीनुसार नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ दाखल केला होता. सदर कामामध्ये अर्जदार यांचे वडील बादशहा गैबी तराळ हे प्रस्तुत खटल्यातील आरोपीस रुपये २५,०००/- एवढया रकमेला जामीनदार होते. त्यानंतर त्यांच्या मालकीचा सी वॉर्ड सीटी क्र.२२६९ पैकी १/२ हिस्सा त्यांचा मुलगा रियाजअहमद याचे नावे तबदिल झाला. सदर कामामध्ये आरोपी गैरहजर राहिल्याने न्यायालयाने जामीनदार बादशहा गैबी तराळ यांना जामीनाची रक्कम रुपये २५,०००/- दंड म्हणून न्यायालयामध्ये जमा करण्याचा आदेश पारीत केला होता. परंतु, दंडाची रक्कम न भरल्याने न्यायालयाच्या आदेशाने रुपये २५,०००/- चा दंड हा तहसिलदार, करविर कोल्हापूर यांचे आदेशाप्रमाणे जामीनदार बादशहा गैबी तराळ यांचेकरिता कोल्हापूर महानगरपालिका हददीतील मिळकत सि.स.न.२२६९ चे प्रापर्टी कार्डवर रियाजअहमद बादशहा तराळ यांचे नावे दिनांक २७/११/१९९८ चे फेरफार क्र.३४० ने दिनांक २७/११/१९९८ रोजी नोंदविणेत आली.

२. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर दिनांक २१/०६/२००६ रोजी न्यायालयाने सदरचा नियमित फौजदारी खटल्यामध्ये वि.प.ने पुर्तता न केल्याने खारीज केला व आरोपीस सदर आरोपातून मुक्त करण्यात आले होते. सदर कामामध्ये अर्जदार यांचे वडील दिनांक २४/०१/२००८ रोजी मयत झाले. परंतु, सदर कामातील रक्कम रुपये २५,०००/- चा जामिनकी बोजा सि.स.न. २२६९ सी वॉर्ड या मिळकत पत्रकावर रियाज अहमद बादशहा तराळ यांचे नावे तसाच राहिला. अर्जदार यांना सदर

मिळकतीवर नवीन घराचे बांधकाम करायचे आहे. परंतु, सदर मिळकतीवर जामीनकी बोजा नोंदणीची अडचण आहे. त्यामुळे नियमित फौजदारी खटला क्र.१११/१९८७ निकाली झालेने सदर मिळकतीवरून बोजा कमी करण्यासाठी न्यायालयाचा आदेश होणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत अर्जादवारे अर्जदार यांनी सि.स.न.२२६९ सी वॉर्ड, कोल्हापूर या मिळकत पत्रकावरील जामीनकी बोजा रुपये २५,०००/- ची तहसीलदार करविर, कोल्हापूर यांनी कमी करणेविषयी योग्य तो आदेश पारित होणेविषयी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी वि.प. यांना नोटीस पाठविण्यात आली व वि.प. यांना सदरच्या नोटीसची बजावणी दिनांक १६/१२/२०२४ रोजी झाले असलेचे पोलीस कॉन्स्टेबल श्री. कळंके यांचे अहवालावरून दिसून येते. पुरेशी संधी देवूनही वि.प. यांनी कामामध्ये हजर राहून आपले म्हणणे दाखल केलेले नाही सबब, दिनांक २७/०६/२०२५ रोजी नि.क्र.१ वर म्हणणे नाहीचा आदेश पारित करणेत आला.

४. प्रस्तुतचा अर्ज तसेच अर्जासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे वकीलांचा युक्तीवाद एकला. अर्जदाराने त्यांचे अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ मध्ये यांचे वडील बादशहा गैबी तराळ हे आरोपीस रुपये २५,०००/- एवढया रकमेला जामीनदार होते. सदर कामामध्ये आरोपी गैरहजर राहिल्याने न्यायालयाने जामीनदार बादशहा गैबी तराळ यांना जामीनाची रक्कम रुपये २५,०००/- दंड म्हणून न्यायालयामध्ये जमा करण्याचा आदेश पारीत केला होता. परंतु, दंडाची रक्कम न भरल्याने न्यायालयाच्या आदेशाने रुपये २५०००/- चा दंड हा तहसिलदार, करविर कोल्हापूर यांचे आदेशाप्रमाणे जामीनदार बादशहा गैबी तराळ यांचेकरिता यांची महानगरपालिका हददीतील मिळकत सि.स.न.२२६९ चे प्रापर्टी कार्डवर दिनांक २७/११/१९९८ चे फेरफार क्र.३४० ने नोंदविणेत आली असे कथन केलेले आहे.

५. अर्जदार यांनी नि.क्र. ३/१ सोबत दाखल केलेल्या नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ निशानी क्र.१ व त्यावरील माननीय मुख्य न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर यांच्या दिनांक २१/०६/२००६ आदेशाचे अवलोकन केले असता वि.प.यांनी सदरचा खटला पुढे चालविण्यासाठी योग्यती पुर्तता न केल्याने सदरचा खटला खारीज करण्यात आलेला आहे व आरोपीस दोषमुक्त करणेत आलेले आहे असे दिसून येते.

६. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांचे वडील बादशहा गैबी तराळ हे आरोपीस रुपये २५,०००/- एवढया रकमेला जामीनदार होते व ते दिनांक २४/०१/२००८ रोजी मयत झालेले आहे. परंतु, सदर कामातील रक्कम रुपये २५,०००/- चा जामिनकी बोजा सि.स.न. २२६९ सी वॉर्ड या मिळकत पत्रकावर तसाच राहिलेला आहे. अर्जदार यांनी नि.क्र.३/३ सोबत बादशहा गैबी तराळ यांचा मृत्यु दाखला हजर केलेला आहे. त्यावरून ते दिनांक २४/०१/२००८ रोजी मयत झालेचे दिसुन येते तसेच नि.क्र. ३/४ सोबत दाखल केलेल्या प्रॉपर्टी कार्डचे अवलोकन केले असता त्यावर नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ मधील आदेशानुसार तहसिलदार यांचे दिनांक १७/१०/१९९८ रोजीचे आदेशाने रक्कम रुपये २५,०००/- चा बोजा नोंद झालेला आहे असे दिसुन येते.

७. वरील विवेचनावरून असे दिसुन येते की, नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ मध्ये माननीय मुख्य न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर यांनी दिनांक २१/०६/२००६ रोजी सदरचा खटला पुढे चालविण्यासाठी वि.प.ने योग्यती पुर्तता न केल्याने सदरचा खटला खारीज केला असून त्या खटल्यामधील आरोपीस दोषमुक्त करणेत आलेले आहे असे दिसून येते. त्यामुळे नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ मधील जामीनदार बादशहा गैबी तराळ यांचा जामीनकदबा रदद करुन तहसिलदार, करविर, कोल्हापूर यांना सि.स.न.२२६९, सी वॉर्ड, कोल्हापूर या मिळकत पत्रकावर जामिनकी बोजा रक्कम रुपये २५,०००/- ची नोंद कमी करणेविषयी आदेश होणे न्यायोचीत होणार आहे. सबब, खालील आदेश पारित करणेत येतो :-

| आ दे श | |
|---|---|
| **१.** | अर्ज मंजुर करणेत येतो. |
| **२.** | नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ मधील जामीनदार बादशहा गैबी तराळ यांचा जामीनकदबा रदद करणेत येतो. |
| **३.** | तहसिलदार, करविर, कोल्हापूर यांना सि.स.न.२२६९, सी वॉर्ड, कोल्हापूर या मिळकत पत्रकावरील नियमित फौजदारी खटला क्र. १११/१९८७ मधील जामिनकी बोजा रक्कम रुपये २५,०००/- ची नोंद कमी करणेचा आदेश देण्यात येतो. |

| | |
|---|---|
| **४.** | सदर आदेशाची प्रत तहसिलदार, करविर, कोल्हापूर यांना पाठविण्यात यावी. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.05.05 17:33:34 +0530

दिनांक - ०५/०५/२०२६
**कोल्हापूर**

**(श्रीमती पंकज बी. राजपूत)**
प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्रं.११, कोल्हापूर.